दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता


## बिबट नियंत्रणास मंजुरी द्या

**पुणे** –नाशिक विभागात वाढता मानव विरूद्ध बिबट संघर्ष धोकादायक टप्प्यावर आहे. महाराष्ट्र शासनाने वैज्ञानिक पद्धतीने बिबटसंख्या नियंत्रण प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावाला तातडीने 'मूलतत्त्व मंजुरी' द्यावी, या मागणीचे पत्र, खा. निलेश लंके यांनी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांना पाठवले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासह अनेक भागात जंगलाऐवजी लोकवस्तीत बिबट्यांचा वावर वाढला आहे. शेती, मानवी वस्त्या व बागायती पट्ट्यात बिबट्यांचे वारंवार दर्शन होत आहे. त्यामुळे महिला, मजूर, शेतकरी आणि लहान मुलांवर गंभीर जीविताचा धोका निर्माण झाला आहे. गेल्या काही वर्षांत मृत्यू, जखमी होणे आणि पाळीव जनावरांच्या हल्ल्यांतही मोठी वाढ झाल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षकांच्या अहवालात स्पष्ट आहे. परंपरागत उपाय निष्फळ ठरत असल्याने शासनाने वैज्ञानिक उपाय सुचविले आहेत.


vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • गुरूवार दि.४ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १०२ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Thrusday 4 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 102 • Pages 4 • Rate 4 Rs




# निवडणूक प्रक्रियेत कोर्टाचा हस्तक्षेप अयोग्य

## नागपूर खंडपीठाचा निर्णय पूर्णपणे चुकीचा

# सरन्यायाधीशांनी हस्तक्षेप करावा-प्रकाश आंबेडकर

**मुंबई (वृत्तसंस्था)–राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा आज जाहीर होणारा निकाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अचानक पुढे ढकलल्याने मोठा राजकीय गदारोळ निर्माण झाला आहे. न्यायालयाच्या या निर्णयावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अत्यंत तीव्र शब्दांत आक्षेप नोंदवला आहे. निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा अधिकार कोणत्याही न्यायालयाला नाही, त्यामुळे नागपूर खंडपीठाचा हा निर्णय पूर्णपणे चुकीचा आणि असंवैधानिक आहे, असे म्हणत प्रकाश आंबेडकर यांनी या निर्णयाला थेट आव्हान दिले आहे.**



### सरन्यायाधीशांनी लक्ष घालण्याची मागणी

**सध्याची परिस्थिती म्हणजे एक 'घटनात्मक पेच' असल्याचे सांगत आंबेडकरांनी सरन्यायाधीशांना यात तातडीने लक्ष घालण्याची विनंती केली आहे. सरन्यायाधीशांनी हे प्रकरण स्वत:च्या ताब्यात घेऊन दुरुस्ती करावी आणि थांबलेली मतमोजणी त्वरित सुरू करण्याचे आदेश द्यावेत. २१ तारखेच्या मतमोजणीला आता काहीच महत्त्व उरलेले नाही, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.**

### राजकीय पक्षांना लढण्याचे आवाहन

निवडणूक आयोगाने न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात स्वत: कोर्टात धाव घ्यावी, अशी मागणी करत प्रकाश आंबेडकर यांनी सर्व राजकीय पक्षांनाही एकजूट दाखवण्याचे आवाहन केले आहे. हा लोकशाही प्रक्रियेतील अडथळा असून, राजकीय पक्षांनी जेलमध्ये जाण्यास न घाबरता याविरोधात आवाज उठवला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

न्यायालयाच्या आदेशामुळे निकालाची तारीख पुढे ढकलण्यात आली असून, आचारसंहिता आता २० डिसेंबरपर्यंत लागू राहणार आहे. यावर प्रतिक्रिया देताना आंबेडकर म्हणाले की, नागपूर खंडपीठाचा हा निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे. एकदा निवडणूक प्रक्रिया सुरू झाली की, संविधानानुसार कोणत्याही न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसतो. विशेष म्हणजे, गेल्याच आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने याच कारणास्तव हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता. असे असताना उच्च न्यायालय निकाल कसा काय थांबवू शकते?

निवडणूक आयोगाच्या नियोजित कार्यक्रमानुसार, १० डिसेंबर २०२५ पर्यंत नवनिर्वाचित नगरसेवकांची यादी गॅझेटमध्ये प्रसिद्ध होणे अपेक्षित होते. मात्र, आता निकालच २१ डिसेंबरला लागणार असल्याने मोठे तांत्रिक आणि कायदेशीर संकट उभे राहिले आहे. यावर बोट ठेवत आंबेडकर म्हणाले, चिन्ह वाटपासारख्या विषयात केवळ जिल्हा न्यायालयाला सुनावणीचा अधिकार असतो, उच्च न्यायालयाला नाही. आता आयोगानेच कार्यक्रम बदलल्याने या दोन्ही प्रक्रिया कशा पूर्ण होणार, हा मोठा प्रश्न आहे.

# केज तालुक्यातील शेतकरी बांधवांनी ई-के वाय सी करुन घ्यावी

## यासाठी सीएससी केंद्र व ग्रामपंचायत स्तरावर सुविधा उपलब्ध-तहसीलदार राकेश गिड्डे

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात अद्याप इ केवायसी न केल्याने अनुदान प्राप्त झाले नाही अशा शेतकऱ्यांची एकूण संख्या ८५४८ इतकी आहे तसेच सदर शेतकऱ्यांचे एकूण ९.१३ कोटी इतके अनुदान वाटप प्रलंबित आहे.त्यामुळे सर्व संबंधित प्रलंबित शेतकरी यांची इ केवायसी करून घेण्या साठी कॅम्प सर्व



सीएससी केंद्रावर आणि ग्राम पंचायत स्तरावर आज पासून आयोजित केला आहे.इ केवायसी पोर्टल हे सकाळी आणि सायंकाळी व्यवस्थित चालत असल्याने कृपया सकाळी लवकर आणि संध्याकाळी इ केवायसी करून घेण्यास सर्व शेतकऱ्यांना कळवावे. प्रलंबित इ केवायसी शेतकरी यांची यादी वाटस अप ग्रुपवर गाव निहाय शेअर करणार असल्याचे तहसीलदार राजेश गिड्डे यांनी सांगितले आहे.

# केज,अंबाजोगाई तालुक्यातील सर्वच साखर कारखाने २८०० पहिली उचल देण्यास तयार

## तहसीलदार राकेश गीड्डे,पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मध्यस्थीने चक्का जाम आंदोलन स्थगित

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज,अंबाजोगाई तालुक्यातील अंबा सहकारी साखर कारखाना,येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट आनंदगाव सा. गंगा माऊली शुगर उमरी, केज या कारखाना कार्य क्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना यावर्षी विनाकपात ३००० रुपये पहिली उचल देण्याची मागणी करत केजच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने दि.३ डिसेंबर रोजी बेमुदत चक्काजाम आंदोलन पुकारले होते. आंदोलनाच्या धास्तीने पोलीस प्रशासन व तहसीलदार,केज यांच्या मध्यस्थीने साखर कारखानदारांचे शेतकी प्रतिनिधी व आंदोलक शेतकरी नेते,पदाधिकारी यांची आज दि.३डिसेंबर रोजी केज तहसील कार्यालयात संयुक्त बैठक घेण्यात आली.या बैठकीला तहसीलदार राकेश गीड्डे,केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उणवणे,गंगा माऊली शुगरचे शेतकी अधिकारी श्री.अदनाक , अंबा साखरचे शेतकी अधिकारी श्री.शिंदे, येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्टचे श्री.पाटील शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड




जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे,शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कमिटीचे सदस्य भाई मोहन गुंड व आंदोलक शेतकरी यांची संयुक्त बैठक संपन्न झाली.या बैठकीत ऊस दरासंदर्भात अनेक चर्चांच्या फेऱ्या झाल्या शेवटी सर्व साखर कारखान्यांनी यावर्षी गाळप होणाऱ्या ऊसाला पहिली उचल विनाकपात २८००रुपये देण्याचे मान्य करत चक्काजाम आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली.व अंतिम ऊस दर रेव्हेन्यू शेअरिंग फॉर्मुल्यानुसार (ठडक्र)देण्याचे निश्चित केले.यावर सर्व शेतकऱ्यांनी एकमत करून चक्काजाम आंदोलन तुर्तास स्थगित केले.बुधवार सायंकाळ पर्यंत सर्व कारखान्यांनी लेखी पत्र देण्याचे मान्य केले आहे जर त्यांनी लेखी पत्र दिले नाही तर पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसू असा निर्वाणीचा इशारा देखील आंदोलकानी दिला आहे.

# गुणवत्तेचा आलेख उंचावण्यात प्रा.अजय पाठक यांचे मोठे योगदान –चंद्रशेखर बर्दापूरकर

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शैक्षणिक गुणवत्तावाढीचा आलेख उंचावण्यात उप प्राचार्य अजय पाठक यांचे मोठे योगदान आहे असे प्रतिपादन योगेश्वरीशिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी केले.

अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे उपप्राचार्य अजय पाठक हे शनिवारी ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत झाले.त्यांच्या सेवानिवृत्ती प्रित्यर्थ महाविद्यालयाच्या वतीने निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळीव्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर,संस्थेचे सह सचिव ओमप्रकाश शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मारुती कानेटकर, उपप्राचार्य डॉ.आर.व्ही. कुलकर्णी,प्रा.नीलिमा कुमठेकर,सत्कारमूर्ती प्रा. अजय




पाठक,सौ.रोहिणी पाठक,डॉ.मैत्रेयी पाठक, अमेय पाठक,धनराज सोळंकी,कमलेश कुमार ठाकूर यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना चंद्रशेखर बर्दापूरकर म्हणाले की,उपप्राचार्य अजय पाठक यांचे व्यक्तिमत्व प्रभाव टाकून जाते. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यात त्यांचे मोठे योगदान आहे.गुणवत्तेचा आलेख उंचावण्यासाठी त्यांनी काम केले.ते संस्थेशी कायम जोडलेले राहतील.त्यांच्या माध्यमा तून अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा मिळाली. अशा शब्दात त्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.यावेळी बोलताना ओमप्रकाश शेटे म्हणाले की,परिस्थिती कशी हाताळायची याचे उत्तम उदाहरण म्हणजे अजय पाठक होय.निष्ठा,समर्पण भावनेतून त्यांनी सेवा केली.एक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे.यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना अजय पाठक यांनी आपल्या ३५ वर्षांच्या सेवेतील चढ उतार सांगितले.आपली जडण घडण संस्थेच्या माध्यमातून झाल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी त्यांच्या मनोगतामध्ये त्यांनी,स्वप्ने उराशी बाळगत विदर्भातून आलेल्या एक तरुणास स्वामी रामानंद तीर्थ यांच्या संस्थेमध्ये प्राध्यापकाची नोकरी करताना संपूर्णआयुष्याची आणि कुटुंबाची जडण घडणं झाल्याचे सार्थक झाले.यावेळी रोहिणी पाठक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने अजय पाठक, रोहिणी पाठक यांचा शाल श्रीफळ व भेट देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचेप्रास्ताविक प्रा.निलिमा कुमठेकर यांनी केले. संचलन वृंदा कुलकर्णी यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. धनराज डोंगरदिवे यांनी मानले.

# ऑल इंडिया पॅन्थर सेना तालुकाध्यक्ष समाधान बचूटे यांचा वाढदिवस साजरा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

ऑल इंडिया पॅन्थर सेनेचे तालुकाध्यक्ष समाधान बचूटे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत कार्य करणारे समाधान बचूटे यांच्या वाढदिवस कार्यक्रमाला बहुजन समाजातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे नेते लिंबराज गायकवाड, बालासाहेब जोगदंड, बहुजन नेते अशोक गायकवाड,तसेच पत्रकारिता क्षेत्रातील नामांकित पत्रकार सचिन भालेराव,रणजित घाडगे, पांडुरंग कसबे,प्रदीप गायकवाड आदी पत्रकार यावेळी उपस्थित होते. यासोबतच वैभव कसबे, दत्ता गायकवाड सर या कार्यकर्त्यांनीही समाधान बचूटे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमात समाधान बचूटे यांनी उपस्थितांचे आभार मानत समाजाच्या हक्क,अधिकार आणि न्यायासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. उपस्थित मान्यवरांनीही त्यांच्या कार्याची प्रशंसा करत पुढील



वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमादरम्यान शाल व पुष्पगुच्छदेऊन वाढदिवस साजरा करण्यात आला आणि समाजातील बांधिलकी जपण्याचा संदेश देत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

संपादकीय

# गाव-खेड्यात बिबट्याची दाहकता समस्या व उपाय

गेल्या काही आठवड्यांपासून बिबट्या आणि मानवी संघर्षाच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. त्यामुळे हा प्रश्न सध्या महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. मुंबईकरांनाही या घटनांची जाणीव चांगलीच आहे. कारण मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानापर्यंत आणि त्याच्या आजूबाजूच्या भागातही अशा गोष्टी अधूनमधून घडत असतात. मात्र ग्रामीण भागात बिबट्याची दाहकता खूपच मोठ्या प्रमाणात जाणवायला लागली आहे. यातच गेल्या आठवड्यात महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक सेवा क्षेत्रातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्त्व म्हणून ज्या नामदेवराव गुंजाळ यांचे नाव आदराने घेतले जाते त्यांच्याशी मुंबईत भेटण्याचा योग आला आणि त्यांच्याकडून या संपूर्ण घटना व त्यांचा अभ्यास पाहिल्यावर थक्क व्हायला झाले. एक शहरी नागरिक म्हणून या बिबट्यांबद्दल एक सुप्त आकर्षण होते, कुतूहल होते. मात्र गुंजाळ यांच्या तोंडातून त्यांचा अभ्यास व त्यावर सुचवलेले उपाय बघितले असता आता खरंच सरकारने यावर गांभीर्याने विचार केला पाहिजे असे वाटून गेले.महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात गेल्या काही वर्षांत बिबट्यांचा वावर आणि हल्ले यामुळे निर्माण झालेली दहशत आता असह्य पातळीवर पोहोचल्याचे दिसत आहे. विशेषतः पुणे, अहिल्यानगर जिल्ह्यातील काही हरित पट्टे जसे संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगाव, राहुरी आणि पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव या तालुक्यांमध्ये बिबट्यांची संख्या झपाट्याने वाढल्याने जनजीवन पूर्णत: विस्कळीत झाले आहे. रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे जीवघेणे झाले आहे. शेतात रात्रभर ठाण मांडणे अशक्य बनले आहे. लहान मुले शाळेत जाण्यास घाबरतात, तर मोठी माणसे घराबाहेर पडताना दहा वेळा विचार करतात. या भागातील शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसानही प्रचंड आहे. ऊस, कांदा, भाजीपाला, द्राक्ष अशा नगदी पिकांच्या शेतात रात्रंदिवस राबावे लागते. पण बिबट्या आला की सगळे पळापळ होऊन थरकाप उडतो. जनावरे मारली जातात, कुत्रे-मांजरी गायब होतात. शेतकऱ्यांना रात्रभर शेतात थांबणे शक्य नसते. कारण स्वतःच्या जीवाची भीती वाटते. परिणामी पिकांचे प्रचंड नुकसान होते. अनेक शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. काहींनी तर शेती सोडून शहराकडे स्थलांतर केले आहे. शिक्षण क्षेत्रावर याचा खोलवर परिणाम झाला आहे. अनेक गावांमध्ये रात्रीच्या वेळी ट्युशन, अभ्यासिका बंद झाल्या आहेत. मुलींच्या शाळा, महाविद्यालयात जाण्याचे प्रमाण कमी झाले आहे. ग्रामीण भागातील मुलींना संध्याकाळनंतर बाहेर पडणे धोकादायक वाटते. काही शाळांनी तर सकाळी उशिरा सुरुवात आणि दुपारी लवकर सुट्टी असे वेळापत्रक बदलले आहे. यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे.आरोग्याच्या बाबतीतही परिस्थिती गंभीर आहे बिबट्या हल्ल्यात जखमी झालेल्या रुग्णांना रात्री रुग्णालयात नेणे कठीण झाले आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे रात्री बंद असतात. गरोदर महिला, ज्येष्ठ नागरिकांच्या तब्येती रात्री अचानक बिघडल्या तर उपचार मिळणे दुरापस्त झाले आहे. मानसिक आरोग्याचा तर पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. भीतीचे सतत दडपण, निद्रानाश, चिडचिड, उदासीनता असे मानसिक आजार वाढीस लागले आहेत. या सगळ्या समस्यांकडे गांभीर्याने पाहिले तर एक गोष्ट स्पष्ट होते की, बिबटे हे वन्य प्राणी आहेत त्यांना मारणे किंवा खच्चीकरण करणे हा कायमस्वरूपी उपाय नाही. त्यामुळे नैसर्गिक संतुलन बिघडेल आणि पुढील काळात मानव वन्यजीव संघर्ष आणखी तीव्र होईल. कारण बिबट्यांच्या पुढच्या पिढीला जंगल नाही तर नागरी वसाहतीचा परिसर हेच आपले आश्रयस्थान आहे असे वाटेल. ग्रामीण महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब जनता यांना जगण्याचा अधिकार आहे. त्याचबरोबर बिबट्यानाही आपल्या नैसर्गिक अधिवासात निर्भयपणे जगण्याचा अधिकार आहे. दोघांचे सहजीवन शक्य आहे. फक्त त्यासाठी हवी राजकीय इच्छाशक्ती आणि शास्त्रोक्त दृष्टिकोनाची गरज. राज्य सरकारने या गंभीर समस्येकडे डोळसपणे पाहण्याची आता गरज आहे. फक्त बिबटे पकडणे किंवा ठार मारणे हा उपाय नव्हे. दीर्घकालीन शास्त्रोक्त आणि मानवी वन्यजीव सहजीवनाला प्रोत्साहन देणारा दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. त्यासाठी ग्रामीण जनतेच्या भावनांचा त्यांच्या भीतीचा त्यांच्या दैनंदिन संघर्षाचा खोलवर अभ्यास केला पाहिजे. मुळात ग्रामीण भागात बिबट्या वगैरे असा कोणताही शब्द नसून ग्रामीण भागात त्यांना वाघच म्हणतात. शेवटी वाघ म्हणा का बिबट्या म्हणा शेवटी हल्ला तो करणारच. बिबट्यांच्या दहशतीमुळे प्राणहानीच नव्हे तर शिक्षणावरही मोठा परिणाम होत आहे. शेतकरी कुटुंबे शेतात वस्ती करून राहतात, तर शाळा, कॉलेज तालुक्याच्या ठिकाणी असतात. शाळा सुटल्यावर अतिरिक्त क्लासेस अभ्यासाची गरज आणि घरी परतण्याचा उशीर हे सर्व मिळून अंधार पडला की भीतीची छाया दाटते. परिणामी पालक मुलांना क्लासेस सोडायला लावतात, ज्यामुळे ग्रामीण मुले शहरातील स्पर्धेत मागे पडतात. ग्रामीण भागात शिक्षणाची रचना शहरापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. गावात प्राथमिक शिक्षण असले तरी माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा किंवा कॉलेज तालुक्याच्या ठिकाणी म्हणजे दहा ते वीस किलोमीटर अंतरावर असतात. मुलांना सकाळी सायकलने किंवा बसने जावे लागते. शाळेची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत असते. आजकालच्या स्पर्धात्मक युगात शाळेतील अभ्यास पुरेसा ठरत नाही यासाठी अतिरिक्त कोचिंग क्लासेस आवश्यक ठरतात. पण ते सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत चालतात. शाळा सुटल्यावर क्लासला जाणे, नोट्स घेणे आणि घरी परतणे यात किमान एक ते दोन तास उशीर होतो. घरी परतण्यासाठी रस्ते खराब, वाहतुकीची सोय कमी आणि मुख्य म्हणजे शेतातून जावे लागते. रस्त्याच्या कडेला ऊस, गवत, फळबागा असतात. वाघ हा शिकारी प्राणी आहे आणि अन्नाच्या शोधात तो गावाच्या जवळ येतोय. अलीकडे वाघाने मनुष्यावर केलेल्या हल्ल्यांच्या अनेक घटना घडल्या, ज्यात अनेक बालके बळी पडली आहेत. सायंकाळी ६ नंतर अंधार पडला की वाघ सक्रिय होतो. मुले-मुली एकटे किंवा गटाने परतत असताना हल्ल्याची शक्यता वाढते. कमी उंचीच्या पक्षावर तो सहज हल्ला करतो. एखादी हल्ल्याची घटना घडली की संपूर्ण परिसरात दहशत पसरते. साहजिकच शिक्षणावर परिणाम होतो आणि ड्रॉपआऊटची संख्या वाढते. ग्रामीण भागाची पुढची पिढी जर अशी अंधारात राहिली, तर शेवटी शिक्षण हा प्रकाश आहे आणि तो पोहोचवण्यासाठी सर्वांनी मिळून एकत्र काम करण्याची गरज आहे. डॉक्टर नामदेवराव गुंजाळे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने या समस्येवर संशोधन करीत आहेत. त्यांनी स्वतःच्या ग्रामविकास व वन्यजीव संवर्धन संस्थेच्या वतीने असे प्रकल्प तयार केले आहेत. जे बिबट्यांना न मारता व खच्चीकरण न करता त्यांचा मानवी वस्त्यांमध्ये होणारा त्रास कायमस्वरूपी कमी करतील. मुळात या बिबट्यांमुळे आता सामाजिक समस्या निर्माण झाल्यामुळे बिबट्या व मानव संघर्षात न होता व त्यांची तात्पुरती सोय न करता कायमस्वरूपी उपाय हवा हेच खरे आहे. त्यावर समस्या व उपाय पुढील भागात पाहूया!

# डोळे अंधारात पण पाऊल प्रकाशात! दिव्यांग मुलगा आणि दृष्टिहीन आईने उजळवला लोकशाहीचा दीप



राज्यभर नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी मतदान होत आहे. मतदानासाठी शासकीय सुट्टी असली तरी निवडणुकीचं कर्तव्य हा माझ्या कामाचा श्वास असल्यामुळे, मतदानाची खबरबात मीडियापर्यंत पोहोचवण्यासाठी मी पहाटेपासूनच खबरदार होतो.सकाळ उगवली ती अगदी निर्वात शांततेने. सर्व शासकीय, निमशासकीय आस्थापना, दुकाने, स्टॉल, टपऱ्या... जणू सुटीची ऊब अंगावर घेत त्यांनी आपले दरवाजे अलगद लपेटून ठेवले होते. या निवांत शहरातून फिरताना काही मतदान केंद्रांवर उमटणारा मतदारांचा उत्साह मात्र मनाला ऊर्जा देणारा होता. याच वातावरणात एक प्रसंग अचानक नजरेसमोर आला आणि क्षणभर मन थांबूनच राहिलं...एक दिव्यांग मुलगा, नवनाथ उत्तम भोई, आपल्या दृष्टीहीन आईचा हात अलगद धरून तिला मतदानासाठी घेऊन जात होता. दैनंदिन संघर्षाच्या सावल्या झेलत जगणाऱ्या श्रीमती सखुबाई उत्तम भोई, आणि तिला आधार देत लोकशाहीच्या मंदिरात नेत असलेला तिचा मुलगा....

हे दृश्य मनाला हेलावून टाकणारं होतं, आणि त्याचवेळी आमच्यासारख्या सक्षम व सुशिक्षित लोकांच्या अंतर्मनातील अंधारात प्रकाश पाडणारंही. कारण इथे फक्त मतदान नव्हतं: इथे कर्तव्याचा हात आणि विश्वासाची बोटं एकत्र येऊन लोकशाहीचा सर्वात सुंदर अर्थ प्रकट करत होती.त्या एका क्षणात जाणवलं,लोकशाहीची खरी शक्ती मोठ्या सभा आणि गर्दीत नाही, तर अशा साध्या, नि:शब्द, ममता आणि कर्तव्याच्या भारलेल्या पावलांत उमटत असते.

भारताची राज्यघटना तयार होत असताना घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची एक ठाम भूमिका होती, भारतातील प्रत्येक नागरिकाला, तो गरीब असो की श्रीमंत, शिक्षित असो की अशिक्षित, दिव्यांग असो वा दुर्बल, समान मतदानाचा हक्क मिळालाच पाहिजे. त्या काळात काही जणांचा आग्रह होता की मतदानाचा अधिकार फक्त मर्यादित आणि सुशिक्षित लोकांनाच द्यावा. अशिक्षित लोकांना मतदानाचा अर्थच कळत नाही असा त्यांचा दावा होता. परंतु असा निर्णय झाला असता, तर देशातील मतदानाची टक्केवारी कदाचित ३०-४० टक्क्यांवरच राहिली असती आणि लोकशाहीची मुळेच कमकुवत झाली असती.

आज यातील विपरीत वास्तव असे की, ज्यांच्यासाठी हा विशेष हक्क राखून ठेवावा असे काहींचे मत होते, तेच सुशिक्षित लोक मतदानाच्या दिवशी घरी बसून राहतात. उलट, ज्यांना हा अधिकार देणे घातक ठरेल असे मानले गेले होते, ते गरीब, अशिक्षित आणि दुर्बल नवनाथ उत्तम भोई आणि श्रीमती सखुबाई उत्तम भोई यांच्यासारखे नागरिक उत्साहाने रांगेत उभे राहून आपला मतदानाचा हक्क बजावतात. ही विषमता डॉ. बाबासाहेबांनी दशके आधीच ओळखली होती लोकशाही टिकवायची असेल तर प्रत्येक नागरिकाचा सहभाग अनिवार्य आहे.आपल्या मतदारसंघात कोण उभा आहे यापेक्षा, मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे, ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. मतदान म्हणजे केवळ एक बटण दाबणे नव्हे; ते आपल्या संविधानाचा, आपल्या स्वातंत्र्याचा आणि आपल्या भविष्याचा सन्मान करणारी कृती आहे. पुढची पाच वर्षे लोकशाही कोणत्या हातात जाणार, हे आपल्या एका मताने ठरते. त्यामुळे मत देणे म्हणजे भविष्यासाठी घेतलेला सर्वात महत्त्वाचा निर्णय.

भारताची लोकशाही ही सामाजिक लोकशाहीचे प्रतिबिंब आहे. देशातील प्रत्येक नागरिक थेट राज्यकारभारावर चर्चा करू शकत नाही, म्हणूनच तो आपल्या प्रतिनिधींना विधिमंडळात पाठवतो. हे प्रतिनिधी जितके सक्षम आणि प्रामाणिक असतील, तितका देशाचा कारभार सुयोग्य रित्या चालेल. त्यामुळे मतदान करून योग्य लोकांना निवडणे ही लोकशाहीची पहिली अट आहे.

मतदान न करणारे लोक आपल्या जबाबदारीबाबत उदासीन आहेत असेच म्हणावे लागेल. म्हणूनच निवडणुकीच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी देण्यात येते. परंतु काहीजण सुट्टीचा फायदा घेत सहलीला जातात, पण मतदानासाठी पाच मिनिटे देत नाहीत. सहलीला जाण्यात काही चुकीचे नाही, पण त्यापूर्वी देशासाठी, समाजासाठी, स्वतःच्या भविष्यासाठी दिलेला एक मताचा क्षण अधिक पवित्र नाही का? निवडणूक आयोगाने मतदानाला उत्सवासारखे साजरे करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे, आणि उत्सवाची सुरुवात आपल्या एका मतानेच होते.विसंगती अशी की भ्रष्ट, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उमेदवारांविषयी सर्वाधिक तक्रारी करणारी मंडळीच अनेकदा मतदानाला जात नाहीत. चांगले लोक मतदान करत नाहीत, म्हणून वाईट लोक निवडून येतात हे वाक्य अक्षरशः खरे ठरते. अशा लोकप्रतिनिधींचा भरणा रोखायचा असेल तर आपल्या संविधानाने आपल्याला एक भेदक अस्त्र दिले आहे मतदान. अमिष, दबाव, भेटवस्तू किंवा पैशाच्या मोहाला बळी न पडता, स्वच्छ लोकशाहीच्या रक्षणासाठी मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे.कारण....मतदान करणे म्हणजे संविधानाचा सन्मान राखणे,आणि हा सन्मान श्री. नवनाथ उत्तम भोई आणि त्यांच्या दृष्टीहीन मातेनं अत्यंत उत्साहात राखला. म्हणून हिंदी आणि उर्दूतील प्रसिद्ध शायर शकील आज़मी यांची शब्दरचना या प्रसंगाला अधिक गडद करते...हार हो जाती है जब मान लिया जाता है

**-रणजितसिंह राजपूत,**
**जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार**

# विवेक,विचार आणि आधुनिकतेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य जर एका वैशिष्ट्यात सामावून सांगायचे झाले, तर ते वैशिष्ट्य आहे - तर्कशुद्ध सामाजिक परिवर्तन. भारतीय समाजाचा इतिहास, धर्म, सामाजिक रचना, जात, परंपरा, रूढी आणि नैतिक मूल्य या सर्वांचा त्यांनी अशा प्रकारे अभ्यास केला की सत्य, विज्ञान, विवेक आणि आधुनिकतेच्या कसोटीवर जे अपूर्ण, अमानवी किंवा अन्यायकारक होते, ते त्यांनी स्पष्ट आणि ठामपणे नाकारले. त्यांचा मनुष्यकेंद्रित दृष्टिकोन हा माणूस सर्वांत मोठा आहे, आणि माणसाच्या प्रतिष्ठेला धक्का देणारी कोणतीही व्यवस्था, परंपरा किंवा मत हे पवित्र असू शकत नाही, असा होता.

भारतीय समाजात धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा, कर्मसिद्धांत, जन्माधिष्ठित श्रेष्ठत्व, कर्मकांड आणि आज्ञाधारित गुलामी यांचे खोलवर मूळ होते. जाणिवांचे द्वार बंद करून समाजाने अनेक पिढ्यांपासून सत्याकडे पाठ फिरवली होती. माणसाला प्रश्न विचारण्याचे आणि विचारांचे स्वातंत्र्य नाकारले गेले. बाबासाहेबांनी सर्वप्रथम प्रश्न विचारण्याची क्षमता जागवली. ते म्हणायचे - अंधविश्वास हे अज्ञानाची कैद आहे. सत्याकडे जाण्यासाठी प्रश्न विचारण्याची हिंमत हवी. ही हिंमतच सामाजिक परिवर्तनाचे पहिले पाऊल आहे. त्यांनी समाजातील विषमता, जातिभेद आणि असमानता यांचे विश्लेषण धर्मग्रंथ, इतिहास, जातीनियम, परंपरा आणि सांस्कृतिक मानसिकतेच्या दृष्टीने केले. जन्मावर आधारित श्रेष्ठत्वाला त्यांनी तर्काने उघडे पाडले. ज्यांचा जन्म विशिष्ट घरात झाल्यामुळे त्यांना मान, आणि दुसऱ्यांचा जन्म झाल्यामुळे अपमान, ही संकल्पना त्यांच्या मते मानवतेवरचा अपमान होता. ते म्हणाले - कोणताही मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही; तो श्रेष्ठ आहे ते ज्ञानाने, विचाराने, कर्माने आणि मूल्यांनी. हा तत्त्वनिष्ठ विचार आजही आधुनिकतेचे सक्षम विधान आहे.

त्यांच्या विचारात विवेक आणि वैज्ञानिकता हे सर्वोच्च आधार होते. बदल घडवायचा असेल तर समाजाला पुरावा, तर्क, अभ्यास आणि विज्ञानाधिष्ठित विचार द्यावा लागतो. अंधश्रद्धा, कर्मकांड, जातविचार आणि अज्ञानावर आधारित परंपरा फक्त मनाला शांत करत नाहीत, तर मनाला गुलाम बनवतात. विज्ञान माणसाला मुक्त करते, कारण ते विचारांना, प्रयोगांना, सुधारणा आणि सत्यशोधनाला दिशा देते. बाबासाहेबांच्या विचारात scientific temper हा शब्द फक्त प्रयोगशाळेसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजजीवनासाठी होता.

ते म्हणायचे, धर्माने जर स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व शिकवले नाही, तर तो धर्म नाही, तो सामाजिक गुलामीचा मुखवटा आहे. त्यामुळे त्यांनी धार्मिक व्यवस्थांचे तर्कशुद्ध परीक्षण केले. धर्म हा मनुष्याच्या नैतिक विकासासाठी असतो, नागरिकांच्या संघर्षाचे कारण होण्यासाठी नव्हे. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकृत केला, कारण बौद्ध धर्म सत्य, विवेक, विचार, मानवी नैतिकता, सामाजिक समता आणि करुणा शिकवतो. बुद्धाने सांगितलेली स्वतःच्या बुद्धीने शोध ही आंबेडकरांना सर्वात प्रिय दिशा होती. धर्म हा जागृतीचा मार्ग असावा, अंधश्रद्धेचा नाही, हा त्यांचा संदेश आजही आधुनिक भारताचा प्राण आहे.

सामाजिक परिवर्तनाचा सर्वात मोठा गाभा म्हणजे मानवाला बांधून ठेवणाऱ्या मानसिक साखळ्या तोडणे. अस्पृश्यता, जात, बहिष्कार, उच्च-नीच, पवित्रता आणि उदासीनता यांच्या नावाखाली समाजाने मानवाला दुय्यम ओळख दिली. बाबासाहेबांनी या मानसिक गुलामीला चिरडून टाकले. ते म्हणाले - आवश्यक नाही की परंपरा योग्यच असते. हजारो वर्षे चाललेले अन्याय हजारो वर्षे झाले म्हणून पावन होत नाहीत. त्यांच्या नजरेत परंपरा, धर्म, समाजमान्यता यांचे स्थान मानवाच्या प्रतिष्ठेपेक्षा नेहमीच खाली होते.त्यांच्या भाषणांत, लेखनांत आणि धोरणांत प्रश्न विचारण्याची ही स्वतंत्रता तीव्रतेने जाणवते. या व्यवस्थेने माणसाला काय दिले? ती व्यवस्थाच जर काहींचा अभिमान आणि काहींच्या अपमानावर उभी असेल तर ती टिकायला लायक आहे का?-या प्रश्नांनी त्यांनी भारतीय समाजाला विचार करायला भाग पाडले. वेद, श्रुती, स्मृती, धर्मशास्त्रे, पुराणे, जातव्यवस्था, वर्णव्यवस्था, बहिष्कार, कर्मसिद्धांत, पवित्रतेची संरचना-या सर्व गोष्टींचे तर्कशुद्ध पुनर्मूल्यांकन त्यांनी केले. कोणत्याही गोष्टीला प्रश्न विचारणे म्हणजे तिचा विरोध नव्हे, तर तिच्या सत्याचा शोध.

सामाजिक परिवर्तनात शास्त्रीय सत्य, मानवकेंद्रित नैतिकता, आर्थिक न्याय आणि समता हे त्यांच्या परिवर्तनदृष्टीचे आधारस्तंभ होते. समाजातील कोणतीही व्यवस्था माणसांच्या सन्मानासाठी काम करायला हवी; जर व्यवस्था काहींच्या वेदनेतून उभी असेल आणि काहींच्या गौरवातून सजली असेल, तर ती व्यवस्था मानवांच्या समाजाला फाडते. बाबासाहेबांचे तत्त्व असे होते की समाजाची व्यवस्था जीवंत असावी; ती बदल स्वीकारणारी, सत्य ओळखणारी, अन्यायाविरुद्ध लढणारी आणि मानव मूल्ये वाढवणारी असावी.



आधुनिकतेच्या दृष्टीने त्यांनी सामाजिक प्रगतीचा मापदंड ठरवला - समाजात मनुष्याच्या विचारस्वातंत्र्याची पातळी किती आहे? स्त्री-पुरुष समानता किती आहे? धर्म आणि जातिव्यवस्था मानवाला किती सन्मान देतात? शिक्षण मनाला किती मुक्त करते? विज्ञानाचा वापर समाजाच्या विकासात किती होतो? समाजात तर्कशक्ती, वैचारिकता, करुणा आणि मानवी मूल्ये किती टिकून आहेत? या प्रश्नांवर समाजाचे उत्तरच प्रगतीचे खरे मापक आहे, असे ते सांगत.त्यांनी विवेक हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी शस्त्र मानले. विवेक म्हणजे स्वयं विचारशक्ती. परंपरागत जीवनात मनुष्याने प्रश्न विचारणे आणि सत्याचा शोध घेणे हे दोन्ही निषिद्ध होते. पण विवेक हेच सत्याचे दार उघडते. बुद्धाच्या धर्मात या विवेकशक्तीचे महत्त्व त्यांच्या मनात दृढ झाले. जीवनात सत्य, करुणा, प्रज्ञा आणि नैतिकता प्रस्थापित करायला विवेक आवश्यक आहे. जेथे विवेक आहे तेथे समता आहे. जेथे विचार आहे तेथे बंधुत्व आहे. जेथे तर्क आहे तेथे स्वातंत्र्य आहे.

सामाजिक परिवर्तनात भावनांना आणि वैयक्तिक मतांना स्थान असले तरी, परिवर्तनाचा अंतिम निर्णय नेहमीच तर्क, तथ्य आणि अनुभवावरच असावा. हेच तत्त्व बाबासाहेबांनी समाजापुढे ठेवले. त्यांनी अनेकदा सांगितले की कोणत्याही सामाजिक व्यवस्थेचे मूल्य तिच्या लाभातून नाही, तर तिच्या नैतिक सत्यातून ठरते. आणि मानवाचे जीवन जर अन्यायात दडपलेले असेल, तर त्या व्यवस्थेला आपण झुकवू नये, तर मोडून काढावे.तर्कशुद्ध परिवर्तनासाठी त्यांनी सहविचार आणि समोविचार पद्धती दिली - समाजाने वादसंवादात उतरावे, विरोधी मतांना ऐकावे, सत्याचा विचार करावा, आणि विचारांच्या आधारावरच भूमिका घ्यावी. बौद्ध धर्मातील विचार-स्वातंत्र्य आणि तर्काधिष्ठित सत्य हे तत्त्व त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या शिल्पात दिसते.

आजचा भारत विज्ञान, तंत्रज्ञान, आधुनिक उद्योग, ज्ञानयुग, संशोधन, प्रगती आणि नवोन्मेष यांच्या दिशेने अग्रसर आहे. या सर्व प्रवासात बाबासाहेबांनी दिलेली विचारशक्ती, विवेक, वैज्ञानिकता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये आपल्याला आधार देतात. राष्ट्र निर्माण करण्यासाठी विचार, विवेक आणि सत्यशोधन ही तीन साधने त्यांनी आपल्या पिढीला दिली.६ डिसेंबरला त्यांच्या पुण्यतिथीप्रसंगी आपण स्वतःला विचारावे - आपण समाजाला तर्क, सत्य, विवेक आणि न्यायाच्या मार्गाने नेत आहोत का? आपण अंधश्रद्धा मोडत आहोत का? आपण विज्ञानाचा वापर मानवकल्याणासाठी करतो का? आपण प्रत्येकाच्या सन्मानाचा विचार करतो का? आपण परिवर्तनात विवेक हे सर्वोच्च मानतो का?

बाबासाहेब म्हणाले -Cultivation of mind should be the ultimate aim of human existence.

मनाची शेती म्हणजे विचार, विवेक, सत्य, करुणा आणि ज्ञान. ही शेती उभी राहिली की समाजातील प्रणाल्या बदलतात. तर्कशुद्ध परिवर्तन म्हणजे आत्मजागृती, आणि आत्मजागृती म्हणजे मानवमुक्तीचा मार्ग.बाबासाहेबांचे हे विवेकाधिष्ठित तत्त्वज्ञान आजही आधुनिकतेचा श्वास बनून समाजात वाहत आहे. कारण त्यांनी आपल्या काळाला फक्त दिशा नाही दिली तर संपूर्ण मानवजातीत तर्काचा सूर्य उगवला.

**-डॉ.भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर**
**महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# शेतकऱ्यांच्या उसदरवाढीसाठीचे आमरण उपोषणाला स्थगिती

**केज । प्रतिनिधी**

केज ,अंबाजोगाई मधिल सर्वच साखर कारखाने पहिली उचल २८००/- रु देण्यास तयार तहसीलदार साहेब यांच्या मदतीने स्थगित आजचे आमरण उपोषण निवेदन देऊन स्थगित केले शेतकऱ्यांच्या उसाला तीन हजार रुपये भाव देण्यात यावा व चार हजार रुपये या मागणीसाठी केज तहसील कार्यालय येथे आमरण उपोषणाचे निवेदन एक डिसेंबरला दिले होते तरी आज तीन डिसेंबर रोजी अमरण उपोषणाला सुरुवात करण्यात येणार होती परंतु केज ,अंबाजोगाई मधिल सर्वच साखर कारखाने पहिली उचल २८००/- रु देण्यास तयार झाले त्यामुळे तहसीलदार साहेब यांच्या मदतीने आजचे आमरण उपोषण निवेदन देऊन स्थगित केले तरी शेतकऱ्यांना पहिली उचल २८०० रुपये येडेश्वरी कारखान्याने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली येडेश्वरी कारखान्याने ३००० रुपये पूर्ण करू असा शब्द दिल्यानंतर आज तीन डिसेंबर २०२५ रोजीचे आमरण उपोषण निवेदन देऊन स्थगित करण्यात आले आहे .यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे मराठवाडा संपर्कप्रमुख अण्णासाहेब जाधव अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रोहन गलांडे पाटील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब सोनवणे भाई सुमंत अण्णा उंबरे सर्व संघटनेचे पदाधिकारी, शेतकरी वर्ग उपस्थित होते.



# निवडणूक आयोगाची सर्कस झालीय का? मुदत संपल्यानंतर ३३ हजार मतदार आले कुठून?

## मुंबईच्या मतदार यादीवरून आदित्य ठाकरेंचा संताप

**दैनिक वादळ वार्ता । मुंबई (वृत्तसंस्था)**

मुंबई महानगरपालिकेच्या २० नोव्हेंबरला प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत अक्षम्य चुका आणि बोगस मतदारांचा भरणा असल्याचे समोर आले आहे. यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला आहे. आमचे आमदार सुनील शिंदे यांचे नाव यादीत तब्बल ७ वेळा, तर माजी महापौर श्रद्धा जाधव यांचे नाव ८ वेळा आले आहे. हा काय सावळागोंधळ सुरू आहे? निवडणूक आयोग म्हणजे एखादी सर्कस झाली आहे का? असा संतप्त सवाल विचारत, मतदार यादीत ३३ हजार बोगस मतदान घुसवल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केलाय.पत्रकार परिषदेत बोलताना आदित्य ठाकरे यांनी आयोगाचा भोंगळ कारभार पुराव्यानिशी मांडला. ते म्हणाले, यादीत आमचे आमदार सुनील शिंदे यांचे नाव सात ठिकाणी आले आहे. गंमत म्हणजे प्रत्येक ठिकाणी त्यांचे वय आणि फोटो वेगळा आहे, पण व्यक्ती तीच आहे. श्रद्धा जाधव, खासदार अनिल देसाई आणि ज्योती गायकवाड यांचीही नावे दुबार आली आहेत. विशेष म्हणजे, या दुबार नावांमध्ये मराठी मतदारांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत आहे. हा योगायोग आहे की सुनियोजित कट, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.आदित्य ठाकरे यांनी आणखी एक गंभीर मुद्दा मांडला. नियमानुसार १ जुलै २०२५ नंतर मतदार यादीत नवीन नावे समाविष्ट करता येत नाहीत. असे असतानाही, या यादीत तब्बल ३३ हजार नवीन मतदार कसे काय आले? असा सवाल त्यांनी केला. तसेच, ५ लाख ८६ हजार लोकांची दुबार नोंदणी असून, ज्या मृत व्यक्तींचे डेथ सर्टिफिकेट जमा केले आहे, त्यांची नावेही यादीतून वगळण्यात आलेली नाहीत. यामुळे त्यांच्या नावावर 'प्रॉक्सी वोटिंग' (बोगस मतदान) करण्याचा डाव आहे का? अशी शंका त्यांनी उपस्थित केली.मतदार यादी तपासणीसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांवरही (BLO) आदित्य ठाकरेंनी ताशेरे ओढले. ज्यांना धड लिहिता-वाचता येत नाही, असे लोक मतदार तपासणी करत आहेत. हा सर्व प्रकार म्हणजे मुंबईकरांची थट्टा सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला. आम्ही इचउ, राज्य आणि केंद्र निवडणूक आयोगाला विचारात आहोत तुम्ही काय करत आहात? थट्टा करत आहात, तुम्ही सर्कस करत आहात. हा घोळ तुम्हीच घातलेला आहे, असा हल्लाबोल आदित्य ठाकरेंनी केला.या सर्व प्रकाराविरोधात आम्ही स्वतः ३ ते ४ हजार हरकती नोंदवल्या आहेत. निवडणूक आयोगाला जाब विचारण्यासाठी आम्ही पत्र दिले असून, या विरोधात मोठी जनचळवळ उभी करू, असा इशाराही आदित्य ठाकरे यांनी दिला आहे.



## प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धेत असली आश्रम शाळेचे मोठे यश! १२ विद्यार्थी विभागीय स्तरावर निवडले

**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी । मोलगी**

धडगाव तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा असली येथील विद्यार्थ्यांनी प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करुन घवघवीत यश संपादन केले आहे.

शासकीय माध्यमिक आश्रम शाळा असली येथे खो खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, लांब उडी, उंच उडी, आदी प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत विविध खेळांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या १२ खेळाडूंची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे. त्यात १४ वर्षे वयोगट (मुले), प्रकाश किरसिंग वळवी खो-खो, लांब उडी, ४०० मीटर धावणे, कुलदीप गणपत १०० मीटर धावणे, बाया आमश्या वसावे खो-खो आणि ६०० मीटर धावणे. १४ वर्षे वयोगट (मुली): तेजश्वरी कांतीलाल तडवी: खो-खो, कौशल्या




शिलप्या वळवी, प्रांजली गौतम तडवी हँडबॉल, अर्चना रमेश वळवी ६०० मीटर धावणे, जयश्री पिसा वसावे व्हॉलीबॉल, १७ वर्षे वयोगट (मुली) निशा कांतीलाल तडवी खो-खो, रिंकू सेमट्या वसावे खो-खो, पल्लवी दिलीप वळवी खो-खो, मनाली भरत वसावे व्हॉलीबॉल, या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पुढील स्पर्धा ह्या विभागीय स्तरावर दि. १६ डिसेंबर २०२५ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे होणार आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक रामजी वळवी यांच्यासह सर्व माध्यमिक शिक्षक, अधीक्षक, परिचारिका आणि वर्ग ४ कर्मचारी व असली गावाच्या ग्रामस्थांनी देखील गौरव केला आहे. विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक शिक्षक अजय वळवी, क्रीडा मार्गदर्शक भिमसिंग पावरा व संघ व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळणारे विजय वसावे यांनी मार्गदर्शन केले.

## अक्कलकुवा तालुक्यातील कंजाला गावात शॉर्ट सर्किटमुळे ४ घरे भस्मसात

### संसारोपयोगी वस्तू,धान्य आणि रोख रक्कम जळून खाक!

**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी । मोलगी**

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील कंजाला गावात ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजून ३०मिनिटाच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत चार घरे पूर्णपणे जळून खाक झाली आहेत. इलेक्ट्रिक मीटरमधील शॉर्ट सर्किटमुळे ही घटना घडल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. कंजाला येथील रहिवासी संदेश पोहल्या वळवी यांच्या घरातून आगीची सुरुवात झाली. संदेश वळवी आणि त्यांचे भाऊबंद शेतात कामाला गेले असताना, त्यांची काकू शांतीबाई वळवी घरात होत्या. अचानक घरातील इलेक्ट्रिक मीटरमधून शॉर्ट सर्किट झाले आणि क्षणात आगीने पेट घेतला. शांतीबाई यांनी आरडाओरड केल्याने शेतातून लोक धावत आले. परंतु, आग इतकी वेगाने पसरली की बघता-बघता संदेश वळवी यांचे दोन घरे तसेच त्यांचे शेजारील टेडग्या रेद्या वळवी आणि पोहल्या रेद्या वळवी यांची घरेही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. स्थानिक ग्रामस्थांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र आगीने रौद्ररूप धारण केल्यामुळे चारही घरे आणि त्यातील सर्व साहित्य जळून खाक झाले. या दुर्घटनेत चारही कुटुंबांचे मोठे नुकसान झाले आहे. घरातील धान्य, संसारोपयोगी वस्तू, टीव्ही, महत्त्वाची कागदपत्रे, चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असे सर्व काही आगीच्या ज्वालेत नष्ट झाले. त्यामुळे ही कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. या घटनेबाबत संदेश पोहल्या वळवी यांनी मोलगी पोलिस स्टेशनमध्ये मंगळवार, २ डिसेंबर २०२५ रोजी अग्नी उपद्रव क्र. ०५/२०२५ प्रमाणे तक्रार दाखल केली आहे. पोलिस हवालदार वनसिंग पाडवी हे पुढील चौकशी करत आहेत. प्रशासनाने या आपद्ग्रस्त कुटुंबांना तातडीने सरकारी मदत जाहीर करून निवारा आणि अन्नधान्याची सोय करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



## नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रमुख चौकांमध्ये तातडीने गतिरोधक बसवा

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

केडगाव येथील लिंक रोडवर वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर प्रमुख चौकाच्या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी मागणी जिल्हाधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे सुजय मोहिते यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देत या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले.

केडगावमधील लिंक रोड गेल्या सहा महिन्यांपासून पूर्ण क्षमतेने सुरू असून या मार्गावरील वाहतुकीत मोठी वाढ झाली आहे. हा रस्ता भूषणनगर, अयोध्यानगर, साईनगर अशा घनदाट लोकवस्ती असलेल्या भागातून जात असल्याने येथे नेहमीच गर्दी असते. अनेक चौकांमध्ये भाजी मार्केट आणि नागरिकांची सततची वर्दळ असल्याने या रस्त्यावर सतत अपघाताचा धोका निर्माण होत आहे.

केडगाव बायपासवरील टोलनाका टाळण्यासाठी अनेक अवजड वाहने या लिंक रोडकडे वळत आहेत. ही वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने नागरिकांना रस्ता ओलांडणे कठीण झाले असून वाहतूक धोकादायक पातळीवर पोहोचली असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

सुजय मोहिते यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वी येथे एका तरुणाचा



भरधाव वाहनाच्या धडकेने मृत्यू झाला. या प्रकारानंतर स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्यावरील वेग नियंत्रणासाठी कोणतीही यंत्रणा नसल्याने हा मार्ग अपघातप्रवण बनला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रमुख चौकांमध्ये तातडीने गतिरोधक बसविणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंब करण्यास भाग पाडू नये, असा इशारा देण्यात आला आहे.

## श्री दत्त जयंतीनिमित्त श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानचे १११ युवक रक्तदान

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

दातरंगे मळा येथील दत्त कॉलनीत दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री दत्त जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या शिबिरात यंदा तब्बल १११ युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान करून समाजसेवेचा उत्कृष्ट आदर्श घालून दिला. या रक्तदान शिबिरात ५ महिलांनी देखील रक्तदान केले आहे. दातरंगे मळा तसेच नगर शहर परिसरातील युवक-युवती आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्साहात प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाला उपस्थित राहिलेले आनंदऋषीजी रक्तपेढीचे सुनील महानुर यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, रक्तदान करून आपण कोणाच्या तरी जीवनात आशेचा किरण निर्माण करतो. रक्त कोणत्याही फॅक्टरीत




तयार होत नाही, त्यामुळे प्रत्येक सक्षम व्यक्तीने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करणे आवश्यक आहे. प्रतिष्ठान गेली २३ वर्षे सातत्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करून नागरिकांमध्ये जागृती निर्माण करत असल्याचे त्यांनी कौतुकपूर्वक नमूद केले.

धार्मिक कार्यक्रमांसह सामाजिक बांधिलकी जपण्याची परंपरा प्रतिष्ठानने कायम ठेवली आहे. रक्तदान शिबिरासोबतच महिलांच्या आरोग्याची काळजी घेत १७५ महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. या उपक्रमासाठी आनंदऋषीजी ब्लड बँकेचे विशेष सहयोग लाभले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सतीश चिंता व श्रीनिवास इप्पलपेल्ली यांनी प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याची माहिती देताना सांगितले की, दत्त जयंती निमित्त दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या रक्तदान शिबिराचा उद्देश रक्ताच्या तुटवड्याची पूर्तता करून जीव वाचविण्यासाठी योगदान देणे हा आहे. युवकांनी केलेल्या उत्स्फूर्त रक्तदानामुळे दत्त जयंतीचा सामाजिक संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचत असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रतिष्ठानतर्फे वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर कार्यक्रम राबविले जातात, याच परंपरेत यावर्षीदेखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. ४ डिसेंबर रोजी दत्त जयंतीनिमित्त महाप्रसाद, धार्मिक कार्यक्रम तसेच सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत सब्बन आणि उपाध्यक्ष रमेश गुंडू यांनी केले आहे.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांसह निलांबरी महिला मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मोठे परिश्रम घेतले.

# नगरचे नेत्रतज्ज्ञ डॉ.सौरभ हराळ यांना गोवा येथील अधिवेशनात 'इंटरनॅशनल हीरो अवॉर्ड' प्रदान

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नेत्रविज्ञान क्षेत्रात नाविन्यपूर्ण संशोधन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून जागतिक पातळीवर शहराचे नाव उंचावणारे युवा नेत्रतज्ज्ञ डॉ. सौरभ हराळ यांना महाराष्ट्र ऑप्थॅल्मिक सोसायटी (चजड) यांच्या वार्षिक अधिवेशनात गोवा येथे'इंटरनॅशनल हीरो अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ.पीयूष बन्सल, डॉ.शिरीष थोरात,डॉ.अनघा हिरुर, डॉ.नितीन उपाध्याय, डॉ.शहा आदींसह मान्यवर उपस्थित होते. नेत्रविज्ञान क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला.देशभरातील नामांकित नेत्रतज्ज्ञ, संशोधक आणि आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या अधिवेशनात डॉ. हराळ यांच्या संशोधनाचा विशेष उल्लेख करण्यात आला. नवीन नेत्रशस्त्रक्रिया तंत्र,



कॅटॅरॅक्ट व रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीतील प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, तसेच ग्रामीण भागातील रुग्णांना आधुनिक उपचार उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांबद्दल अधिवेशनात गौरवोद्गार काढण्यात आले.पुरस्कार स्वीकारताना कृतज्ञतेची भावना व्यक्त करताना डॉ. हराळ म्हणाले, हा सन्मान माझा नसून अहिल्यानगरातील जनतेचा विश्वास, रुग्णांचे आशीर्वाद आणि माझ्या संपूर्ण टीमच्या परिश्रमांचे प्रतीक आहे. आपल्या शहरात जागतिक दर्जाचे नेत्रउपचार उपलब्ध करून देण्याचे ध्येय पुढेही कायम ठेवणार आहे.गेल्या काही वर्षांत डॉ. हराळ यांनी चष्मा काढण्याच्या लेझर शस्त्रक्रियांमध्ये (Refractive Surgery) मोठा अनुभव मिळवला आहे. अत्याधुनिक लेझर तंत्रज्ञान, अचूक निदान आणि सुरक्षित शस्त्रक्रिया पद्धतींच्या आधारावर त्यांनी हजारो रुग्णांना चष्मा-कॉन्टॅक्ट लेन्सच्या त्रासातून मुक्त केले आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांत उपचारासाठी जाण्याची वेळ येऊ नये, यासाठी त्यांच्या टीमने सातत्याने आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. अहिल्यानगरातील त्यांच्या नेत्ररुग्णालयात कॅटॅरॅक्ट, रेटिना, ग्लॉकोमा, कॉर्निया, लेझर व चष्मा काढण्याच्या विशेष शस्त्रक्रियांसह सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. मायनस-प्लस नंबर, दूरदृष्टी, अतिदूरदृष्टी, सिलिंडीळलरश्र नंबर अशा समस्या दूर करण्यासाठीच्या लेझर उपचारात त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन सादर करून त्यांनी राज्यातील तसेच राज्याबाहेरील रुग्णांमध्येही विश्वास संपादन केला आहे.

या भव्य सन्मानानंतर अहिल्यानगरातील विविध सामाजिक संस्थांकडून, नागरिकांकडून आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून डॉ. हराळ यांच्या कार्याचे कौतुक होत असून, शहरातील वैद्यकीय क्षेत्राला नवीन प्रेरणा मिळाल्याचा आनंद व्यक्त केला जात आहे.

# गटविकास अधिकारी आणि सहाय्यक गट विकास अधिकारी यांच्या बेशिस्त वर्तनामुळे अक्कलकुवा पंचायत समितीचे कामकाज ठप्प

## वकिलांच्या समक्ष शासकीय फाईल फेकल्याचा गंभीर आरोप!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

अक्कलकुवा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि सहाय्यक गटविकास अधिकारी यांच्या मनमानी कारभाराविरोधात युवा क्रांती नंदुरबार या सामाजिक संघटनेने आता थेट जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे धाव घेतली आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांचे बेशिस्त वर्तन, गैरहजेरी आणि शासकीय कार्यालयात असभ्य वागणूक यामुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन होत असल्याचा गंभीर आरोप ई-मेल द्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी नंदुरबार यांना पाठवण्यात आलेल्या पत्राद्वारे करण्यात आला आहे.

युवा क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष ड.रुपसिंग वसावे यांनी ई-मेल द्वारे दिलेल्या निवेदनानुसार, गेल्या आठवड्यात पंचायत समिती कार्यालयात सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांनी जन्म-मृत्यू नोंदणीसंदर्भातील शासकीय फाईल कोणतेही कारण न सांगता, वकिलांच्या व नागरिकांच्या समक्ष टेबलावरून फेकून दिली. शासकीय कार्यालयात झालेले हे उद्धट वर्तन सेवाविषयक नियमांचे स्पष्ट उल्लंघन असूनही संबंधित अधिकाऱ्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. वरिष्ठ अधिकारी अशा बेशिस्त कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा संशय या संघटनेने व्यक्त केला आहे.

दि.३ डिसेंबर २०२५ रोजी युवा क्रांतीच्या प्रतिनिधींनी पंचायत समिती कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी केली असता, कार्यालयीन वेळेत गटविकास अधिकारी आणि सहाय्यक गटविकास अधिकारी हे दोघेही दालनात अनुपस्थित असल्याचे आढळून आले. विशेष म्हणजे, दोन्ही दालनांमधील पंखे आणि लाईट्स सुरू होते. या बेजबाबदारपणामुळे एकीकडे शासकीय साधनसामग्रीचा अपव्यय होत आहे, तर दुसरीकडे दुर्गम भागातून कामासाठी आलेल्या नागरिकांना तासन्तास ताटकळत बसावे लागत आहे. या प्रकारामुळे सामान्य जनतेचा वेळ, पैसा आणि मानसिक शांती यांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे, असे संघटनेने आपल्या पत्रात नमूद केले आहे.रुपसिंग वसावे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी नंदुरबार यांना दिलेल्या पत्रात तातडीने कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, जनतेच्या सेवेसाठी नेमलेले अधिकारी जर अशा प्रकारे अपमानास्पद आणि बेशिस्त वर्तन करत असतील, तर त्यांच्यावर तात्काळ शिस्तभंगाची कारवाई करून त्यांचा पदभार त्वरित काढून घेण्यात यावा. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी न झाल्यास युवा क्रांती नंदुरबारच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. आंदोलनातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित अधिकारी आणि प्रशासन जबाबदार राहील, असा कडक इशारा संघटनेने दिला आहे. या गंभीर तक्रारीमुळे नंदुरबार जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. आता मुख्य कार्यकारी अधिकारी या बेशिस्त अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करतात, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

> **मी अक्कलकुवा पंचायत समितीमध्ये नव्यानेच रुजू झालो असून मला रुजू होऊन अवघे काही दिवस झाले आहेत. अशा परिस्थितीमध्ये मला या संदर्भातील जास्त माहिती नाही मी जेव्हापासून हजर झालो आहे तेव्हापासून माझ्याकडे आलेली सर्व कामे मी पूर्ण केली आहेत. तसेच सर्व कर्मचाऱ्यांना वेळेत कार्यालयात हजर होण्याबाबत देखील मी सूचना दिलेल्या आहेत. तसेच मी सर्व विभागांचा आढावा घेतला असून प्रलंबित फायलींचा तात्काळ निपटारा करण्यासंदर्भात मी योग्य ती माहिती घेऊन तात्काळ कार्यवाही करणार आहे.**
> **विजय अहिरे,गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकुवा.**

## परळी शहरातील प्रभाग १ ,प्रभाग ११, प्रभाग १२ येथे

# फेर मतदान घेण्याची मागणी मुख्य निवडणूक आयुक्त कडे दीपक देशमुख यांनी केली

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र, शहरातील काही प्रभागांमध्ये बोगस मतदान झाले आहे याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख व माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख यांनी पुनः मतदान करण्याची मागणी केली आहे.परळी वैजनाथ येथील निवडणूक मतदानादिवशी झालेल्या प्रभाग १ , प्रभाग ११ प्रभाग १२ येथे बोगस मतदान, सीसीटीव्ही तपासणी, या तीन प्रभागात फेर मतदार घेण्यात यावे. निवडणूक प्रशासन पोलीस प्रशासनाकडून पक्षपातीपणा उच्चस्तरीय सखोल चौकशी करून कारवाई करावी .




याबाबत राज्य निवडणूक आयुक्तास सौ. संध्या दीपक (नाना) देशमुख, दीपक रंगनाथ देशमुख यांनी निवेदन केले आहे. परळी वैजनाथ येथे दि. २ डिसेंबर २०२५ रोजी परळी शहरातील प्रभाग क्रमांक १, प्रभाग, प्रभाग ११, क्रमांक १२ या ठिकाणी बोगस मतदान झाले आहे. या बूथवर फेर मतदान घेण्यात यावे. या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज चेक करून, कारवाई करावी, व याच ठिकाणी सि.सि टी.व्ही बंद होते. या ठिकाणी बोगस मतदान करण्यात आले. या ठिकाणी देखील फेर मतदान घेण्यात यावे त्याचा आक्षेप मतदान प्रक्रिया चालू असताना घेतला गेला होता. परंतु नियम दाखवून उमेदवार व त्यांचे बुथ प्रतिनिधी यांना उडवाउडवीची उत्तरे व उद्धटपणाची वागणूक या बुथ वर काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून झाली, तसेच पोलीस कर्मचारी देखील विरोधी पक्षाच्या उमेदवारांना चांगली वागणूक व इतर उमेदवारांना जाणीवपूर्वक मतदार केंद्रावर येण्यापासून रोखले, प्रभाग १ वर १९ वर्षाच्या मतदाराचे मतदान ७० वर्षाचा व्यक्ती करताना आढळून आला. या ठिकाणी आक्षेप घेतले गेले असताना आक्षेप घेणाऱ्या उमेदवार व त्याच्या प्रतिनिधीला उडवाउडुची उत्तरे देण्यात आली व अन्याय केला, याच बुथवर सीसीटीव्ही कॅमेरा देखील काळा कपडा लावून बंद करण्यात आला होता. यावरही ऑब्जेक्शन घेतले परंतु त्या ठिकाणी कसल्या प्रकारचा न्यायनिवाडा झाला नाही. प्रभाग १२ मध्ये भाजपचा कार्यकर्ता पवन फुटके व त्याचे इतर साथीदार याने तर खूप उच्छाद मांडला होता मतदान करण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक महिलेसोबत बुथ वर येऊन प्रत्येक महिलेचा नातेवाईक आसे भासऊन मतदान करून घेत होता. त्याही गोष्टीला विरोध करून या घटने संदर्भात २ डिसेंबर रोजी पत्रकार परिषदेतील घेण्यात आली होती. या ठिकाणी बोगस मतदान झाले आहे. ज्या ठिकाणी आक्षेप घेतल्या त्या ठिकाणी सीसीटीव्ही फुटेज तपासून बंद असलेल्या सीसीटीव्हीची तपासणी करून, बंद असलेल्या मतदान केंद्रावर फेर मतदान घेण्यात यावे. व योग्य ती कार्यवाही करावी अशी अपेक्षा या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.आता आपणच निवडणूक व्यवस्थेचे प्रमुख म्हणून सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ती कठोर कारवाई करून लोकशाही वाचवून उमेदवाराला व जनतेला न्याय द्यावा. अशी मागणी राज्य निवडणूक आयुक्तास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार सौ. संध्या दीपक (नाना) देशमुख,व माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ यांनी केली आहे.

# लोहा तालुक्यातील जामगा शिवनी येथे ऊस वाहतुकीमुळे रस्त्यांची स्थिती बिघडली-नागरिकांची चिंता वाढली

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

तालुक्यातील मौजे जामगा शिवनी येथील २१ टवेन्टीवन शुगर्स लिमिटेड साखर कारखान्याच्या युनिट नंबर ३ च्या परिसरात ऊस वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणावर रस्ता खराब होण्याचे प्रमाण वाढले आहे. खासकरून शेवडी (बा) येथील जनावरांच्या हॉस्पिटलसमोरील रस्ता या वाहतुकीमुळे अत्यंत खराब झाल्याने लोकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे.शेवडी (बा) येथील ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर दोन-दोन ट्रेलर जोडून ऊस पोहचवण्याची व्यवस्था आहे, ज्यामुळे रस्त्याची स्थिती अधिकच खराब झाली आहे. ट्रॅक्टर आणि ट्रेलरच्या ओझ्यामुळे रस्त्यावर गड्ढे, खड्डे आणि मोठ्या प्रमाणावर उकळले गेले आहेत. या वाहतुकीमुळे रस्ता आणखी अधिक घसरट होतो आहे, ज्यामुळे प्रवाशांना आणि वाहनधारकांना मोठा धोका निर्माण होतो आहे.तसेच, अवैध ऊस वाहतुकीचीही चर्चा सुरू आहे. काही लोकांच्या म्हणण्यानुसार, कधी कधी अवैध वाहतूक आणि अनियंत्रित ट्रॅक्टरच्या माध्यमातून हा ऊस घेतला जातो, ज्यामुळे जिविताला धोका पोहचू शकतो. लोकांच्या सुरक्षेसाठी आणि वाहतुक व्यवस्थेसाठी यावर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी



मागणी होत आहे.याव्यतिरिक्त, या अव्यवस्थित वाहतुकीमुळे कधी कधी वाहतुक कोंडी देखील होते, आणि गावातील नागरिकांना त्यांच्या रोजच्या कामासाठी बाहेर पडण्यास अडचणी येत आहेत. या परिस्थितीवर स्थानिक प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे आणि वाहतुक नियंत्रित करण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.रस्त्याच्या दुरुस्तीच्या संदर्भात काही कामे सुरू करण्यात आली आहेत, परंतु या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे. ट्रॅक्टर व ट्रेलरच्या वाहतुकीसाठी योग्य मार्गदर्शन आणि नियमांची अंमलबजावणी केली पाहिजे, अशी अपेक्षाही लोकांनी व्यक्त केली आहे.

रस्त्यांच्या स्थितीमुळे गावातील जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होत आहे, आणि या समस्येचा मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच, स्थानिक प्रशासन, साखर कारखाना आणि संबंधित संस्थांनी एकत्र येऊन या समस्येवर तोडगा काढावा, अशी सर्वसामान्य नागरिकांची भावना आहे.

# मंत्रालयात महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न

## राजेश कुमार यांचा भारत वानखेडे यांच्यासहित अनेकांनी केला सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

मुंबई येथील मंत्रालयात महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्य सचिव राजेश कुमार (भा.प्र.से.)यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्यानिमित्त त्यांचा अनु जाती -जमाती , विजा-भज -इमाव,विमाप्र शासकीय - निमशासकीय अधिकारी कर्मचारी संघटना मंत्रालय महाराष्ट्र राज्य मुंबई चे संस्थापक अध्यक्ष भारत वानखेडे यांच्यासहित अनेक सत्कार केला. यावेळी संघटनेचे मुख्य सल्लागार लक्ष्मीकांत ढोके तथा सहसचिव मंत्रालय मुंबई, कार्याध्यक्ष अंबादास चंदनशिवे तथा उपसचिव मंत्रालय, अशोक आत्राम सहसचिव मंत्रालय, डॉ पुंकुलडवार सहसचिव मंत्रालय इत्यादी आदी होते.




# साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय सॉफ्टबॉल संघात निवड

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित,साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय सॉफ्टबॉल संघात निवड झाली आहे.दि २६ नोव्हेंबर २०२५ ते ०१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यस्तरीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल, नागपूर,कोराडी रोड नागपूर येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाचा १७ वर्ष मुलींचा संघ सहभागी झाला होता.या संघातील कु.ज्ञानेश्वरी माणिक चौरे हिची महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघात निवड झाली असून सदर स्पर्धा छत्तीसगड येथे पार पडणार आहे.तर १९ वर्षे वयोगट मुलांच्या संघात चि.आदित्य अरविंद विद्यागर




या खेळाडूची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली आहे.सदर राष्ट्रीय स्पर्धा नागपूर येथे संपन्न होणार आहेत.या दोन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर,तालुका क्रीडा अधिकारी अनिकेत काळे सर,केज तालुका क्रीडा अधिकारी राखी यादव मॅडम,संघटनेचे अध्यक्ष श्री.दिनकर थोरात सर,सॉफ्टबॉलचे मार्गदर्शक सतीश राठोड सर,बेसबॉलचे मार्गदर्शक रेवन्नाथ शेलार सर,बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष ड.उद्धवराव कराड सर,श्री.कापसे सर मार्गदर्शिका डॉ.कविता गित्ते मॅडम या सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक श्री.रामदास सानप सर, कृष्णा गित्ते,केशव कराड, श्री.साखरे सर,श्री.घुले सर श्रीमती कांदे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई! उपनगर आणि तळोदा येथील दोन घरफोडीचे गुन्हे उघड; १.५ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

स्थानिक गुन्हे शाखेने जिल्ह्यामध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्यांची यशस्वीरित्या उकल केली आहे. उपनगर आणि तळोदा पोलीस स्टेशन हद्दीतील या दोन गुन्ह्यांमध्ये, सराईत आरोपींसह पाच जणांना (विधीसंघर्षग्रस्त बालकांसह) ताब्यात घेण्यात आले असून, चोरलेला रुपये १,५०,००००/ - हून अधिक किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस आणि अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील आणि त्यांच्या पथकाने ही उल्लेखनीय कामगिरी केली.



**१. नंदुरबार उपनगर येथील इलेक्ट्रीक गोडाऊन चोरीचा उलगडा–:**उपनगर पोलीस ठाण्यात दिनांक २८नोव्हेंबर २०२५ रोजी एका इलेक्ट्रीक गोडाऊनमध्ये चोरी झाल्याचा गुन्हा दाखल होता. गोडाऊनची खिडकी फोडून चोरट्यांनी रुपये ३३,०३०/- किमतीचे इलेक्ट्रीकल साहित्य चोरले होते. गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हुडको चौक परिसरातून तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले. या बालकांनी गुन्ह्याची कबुली देत, चोरलेला मुद्देमाल हुडको कॉलनी परिसरातील एका काटेरी झुडूपात लपवून ठेवल्याचे सांगितले. पथकाने त्वरित कारवाई करत, रुपये २५,९२५/- किमतीचे साहित्य जप्त केले.

**२. तळोदा येथील घरफोडीतील दोन आरोपी जेरबंद:–** दुसऱ्या एका कारवाईत, तळोदा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणला गेला. बंद घराचा कडी कोयंडा तोडून चोरट्यांनी रुपये १,२१,०००/- किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली होती. या चोरीमागे नंदुरबार शहरातील सराईत आरोपी शरद ऊर्फ पवन गोंधळी आणि त्याच्या साथीदारांचा हात असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हा शाखेलाला मिळाली. पथकाने नळवा रोडवरील एका हॉटेलजवळून दोन आरोपींना अटक केली त्यात शरद ऊर्फ पवन अरुण चव्हाण (गोंधळी), वय २४ वर्षे. गुरुपालसिंग कप्तानसिंग शिकलीकर, वय १८ वर्षे. आरोपींकडून रोख रुपये ४,११०/- जप्त करण्यात आले असून, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या या जलद व प्रभावी तपासामुळे गुन्हेगारी प्रवृत्तींना वचक बसण्यास मदत झाली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077